# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन शिवार, नाशिक - 422 222.

दूरध्वनी - (0253) 2231714, 2231715, 2230027


जा.क्र.- यचममुवि/आस्था/2022/486 दिनांक : 13.04.2022

**सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. वशिअ - 1214/प्र.क्र.26/11, दिनांक 02 जून 2014**

## परिपत्रक

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या सर्व नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी (ड वर्गातील कर्मचारी वगळून) दिनांक 31 मार्च, 2022 रोजी असणाऱ्या त्यांच्या मत्ता व दायित्वे यांचे वार्षिक विवरणपत्र प्रपत्र 1,2 व 3 मध्ये नमूद केल्यानुसार भरून, सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाची आहेत. विवरणपत्राचे लिफाफे सिलबंदच असावेत. खुल्या स्वरूपात कोणत्याही स्थितीत विवरणपत्रे पाठवू नयेत. सदर लिफाफ्यावर खालील बाबी नमूद कराव्यात.

1. मत्ता व दायित्वाचे वार्षिक विवरणपत्र दिनांक 31 मार्च 2022 अखेर.
2. शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम
3. विद्याशाखा / विभाग / केंद्र / कक्षाचे नाव

विद्याशाखा / विभाग/ केंद्र / कक्षातील प्रत्येक कर्मचाऱ्याचे (ड वर्गातील कर्मचारी वगळून) दिनांक 31 मार्च 2022 रोजी असणाऱ्या मत्ता व दायित्वाच्या विवरणपत्राची माहिती भरून घेऊन आस्थापना कक्षाकडे दिनांक 31 मे 2022 पर्यंत पाठविण्यात यावी. विवरणपत्रे विहीत कालावधीत सादर न केल्यास संबंधित कर्मचारी शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरेल. पदोन्नती / आश्वासित प्रगती योजनेतील पदोन्नतीसाठी विवरणपत्र सादर केल्यानंतरच पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल, याची सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जाणीवपूर्वक नोंद घ्यावी.

कुलसचिव

सोबत - विवरणपत्र 1,2 व 3

प्रत माहितीसाठी - मा. कुलगुरू कार्यालय

प्रति - 1. सर्व विद्याशाखा/विभाग/केंद्र/कक्ष प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक अधिनस्त सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी (ड वर्गातील कर्मचारी वगळून) यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

2. सर्व विभागीय केंद्र

3. प्रोग्रामर, संकेतस्थळ माहीतीसाठी, सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.


य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक

आवक क्र. 24

दिनांक : 19/4